| MHDH070029632021 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ६६१/२०२१ मधील निशाणी क्र. ४ वरील आदेश. (भाग्यश्री रुपेश उर्फ बाळासाहेब वि. रुपेश उर्फ बाळासाहेब)** |
|---|---|

प्रस्तुतचे प्रकरण हे महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२ प्रमाणे दाखल केलेले आहे. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदाराने सदर अधिनियमाच्या कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराच्या अर्जातील कथन थोडक्यात असे की, अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह दिनांक २३.१२.२०१९ रोजी मौजे गणपुर, ता. चोपडा, जि. जळगांव येथे बौध्द धर्मशास्त्रानुसार झालेला आहे. सदर लग्न संबंधातून त्यांना कोणतेही अपत्य नाही. गैरअर्जदार क्र. २ हे अर्जदाराची सासु, गैरअर्जदार क्र. ३ व ४ नणंदा व अर्जदार क्र. ५ मामेसासरे आहेत. विवाहात अर्जदाराच्या आईवडीलांनी गैरअर्जदारांच्या घरसंसार उपयोगी वस्तु तसेच अर्जदारला सोन्याचे दागदागिने दिले. विवाहानंतर गैरअर्जदार हे अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेवून तिला विभित्स शिविगाळ करत असत. तसेच गैरअर्जदार हे क्रुझर वाहन घेण्यासाठी रुपये पाच लाखाची मागणी करत असत. परंतू, अर्जदाराच्या आईवडीलांनी विवाहात बराच खर्च केल्यामुळे ते गैरअर्जदारांची मागणी पूर्ण करु शकत नाहीत. गैरअर्जदारांच्या शारिरिक व मानसिक त्रासामुळे अर्जदार ही नेहमी आजारी असते. तिच्याकडून कोणताही कामधंदा होत नाही.

३. अर्जदाराने पुढे कथन केले की, गैरअर्जदार यांची मौजे गणपूर येथे मोठी बागायती शेती असून त्यांना त्यापासून वर्षाला चार ते पाच लाख रुपये उत्पन्न येते. तसेच त्यांचे गावात पक्के घरे देखील आहेत. गैरअर्जदार क्र. १ याच्यावर अर्जदाराव्यतिरिक्त कोणाचीही जबाबदारी नाही. प्रस्तुत मुळ अर्जाचा निकाल होण्यास अवधी लागेल सबब, अर्जदाराने विनंती केली की, अर्जदार हिस दरमहा रु. १५,०००/– अशी अंतरिम पोटगी अर्ज दाखल तारखेपासून मिळावी.

४. गैरअर्जदार क्र. १ याने प्रस्तुत अर्जास निशाणी क्र. ८ आपले म्हणणे दाखल केले आहे. गैरअर्जदाराने अर्जदार व त्याचे नातेसंबंध मान्य केले आहेत. परंतू, अर्जातील इतर सर्व कथने नाकारलेली आहेत. त्याने पुढे कथन केले की, अर्जदार ही गैरअर्जदारांकडे नांदण्यास आली असता दोन ते चार महिने व्यवस्थीत नांदली. त्यानंतर ती व्यवस्थीत राहत नसते. ती गैरअर्जदार क्र. १ यास सतत म्हणत असे की, माझे येथे चित्त लागत नाही, तो तिला आवडत नाही, तिच्या त्याच्यासोबत संसार करण्याची इच्छा नाही. अर्जदार हिला सुरुवातीपासूनच माहेरची ओढ होती व तिला वेडसरपणाचे झटके येत होते. अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ व त्याच्या आईला शिविगाळ करत असे. अर्जदार हिला तिच्या आईचा फोन आल्यावर ती कोणालाही काहीएक न सांगता तिच्या माहेरी निघून जात असे. अर्जदार ही कोणतेही कारण नसतांना माहेरी राहत आहे व तिने गैरअर्जदारांकडे नांदण्यास स्पष्ट नकार दिलेला आहे. दिनांक १७.०४.२०२१ रोजी गैरअर्जदार अर्जदारास नांदण्यास घेण्यासाठी गेला असता अर्जदाराने नांदण्यास येण्यास स्पष्ट नकार दिलेला आहे. त्यानंतर दिनांक २६.०४.२०२१ रोजी गैरअर्जदारोन अर्जदारास नोटीस देवून नांदण्यास येण्याबाबत कळविले परंतू, तरी देखील अर्जदार नांदण्यास आलेली नाही. गैरअर्जदारास उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. सबब, त्याने अर्ज नांमजूर करण्याची विनंती केलेली आहे.

५. अर्जदारातर्फे विद्वान वकील श्री. एस.व्ही पटेल यांचा युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदारास पुरेशी संधी देवून देखील युक्तीवाद न केल्याने प्रस्तुत अर्ज विना युक्तीवाद चालविणेबाबत आदेश पारित करण्यात आला.

६. गैरअर्जदाराने निशाणी क्र. १२ वरील यादीसोबत अमळनेर येथील म. दिवाणी न्यायाधीश व.स्तर यांचे न्यायालयातील एच.एम.पी. नं. १५६/२०२१ मधील निशाणी क्र. १ तसेच निशाणी क्र. ८ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यावरुन गैरअर्जदाराने अर्जदाराविरुध्द हिंदू विवाह कायदा, १९५५ चे कलम ९ प्रमाणे वैवाहीक हक्कसंबंध पर्नस्थापित करुन मिळणेकरिता प्रकरण दाखल केल्याचे दिसून येते.

७. अर्जाची व्याप्ती तपासत असतांना व अर्जदाराने प्रार्थना केलेला अनुतोष मिळण्यास अर्जदाराची पात्रता ठरवितांना अर्जदारावर तिच्यावर झालेल्या अत्याचाराबाबत प्रथमदर्शनी केस आहे किंवा कसे हे तपासून पहाणे आवश्यक आहे. मुळ अर्जाचे अवलोकन केले असता, अर्जदाराने गैरअर्जदारांनी तिचा शारिरिक व मानसिक छळ केल्याबाबत तपशिलवार कथन केलेले आहे. अर्जदाराने अर्जात कथन केलेले गैरअर्जदार यांच्या विरुध्दचे सर्व आरोप, त्यांची पुनरावृत्ती करणे संक्षेपाकरिता आवश्यक वाटत नाही, ते गैरअर्जदार याने जरी नाकारले असले तरी अर्जदार स्वतःच्या संसाराचा आणि आयुष्याचे नुकसान करुन घेवून खोटेपणाने नमूद करेल असे वाटत नाही. त्यामुळे पत्नी म्हणून अर्जदाराने दिलेला पुरावा हा महत्वाचा असू शकतो. अर्जदाराच्या सदर अर्जामधील कथनांवरुन गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा शारिरिक व मानसिक छळ केला हे याठिकाणी प्रथमदर्शनी दिसून येते. सबब, अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ कडून पोटगी मिळण्यास पात्र आहे.

८. यानंतर अर्जदार किती अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे, हे पहाणे आवश्यक आहे. अर्जदाराचे असे कथन आहे की, गैरअर्जदार यांची मौजे गणपूर येथे मोठी बागायती शेती असून त्यांना त्यापासून वर्षाला चार ते पाच लाख रुपये उत्पन्न येते. तसेच त्यांचे गावात पक्के घरे देखील आहेत. परंतू, अशाप्रकारे गैरअर्जदारास हिस उत्पन्न मिळते याबाबत अर्जदाराने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. परंतू, गैरअर्जदाराने तो मजूरी करत असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी गैरअर्जदार हा सुदृढ व्यक्ती असलयाचे स्वीकारावे लागेल. याबाबीचा विचार केला असता तो महिन्याला ₹ १०,०००/- ते १२,०००/- कमवू शकतो हे स्वीकारावे लागेल. अर्जदार स्वतःचे पालनपोषण करण्यास असमर्थ असल्याचे आणि गैरअर्जदार यास उत्पन्नाचे साधन असूनही त्याने अर्जदाराच्या पालनपोषण करण्यास जाणुनबूजून कुचराई केल्याचे पथमदर्शनी दिसून येते. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदाराच्या पालनपोषणाची व्यवस्था केली असल्याचे दिसून येत नाही. अर्जदार ही २० वर्षाची महिला असून तिच्या उदर निर्वाहाचा, वैदयकीय तसेच दैनंदिन गरजा त्याचबरोबर

गैरअर्जदार क्र. १ च्या आर्थिक क्षमतेचा विचार करता अर्जदार हिस दरमहा ₹ २५००/– (दोन हजार पाचशे मात्र) इतकी अंतरिम पोटगी गैरअर्जदार क्र. १ ने देणे प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून देणे आदेशित करणे योग्य होईल. करिता आदेश खालील प्रमाणेः

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. १ याने प्रस्तुत अंतरिम पोटगी अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दिनांक १०.१२.२०२१ पासून अर्जदार हिस दरमहा ₹२५००/– (दोन हजार पाचशे मात्र) इतकी अंतरिम पोटगी मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत दयावी.

३. प्रस्तुत अर्जाचा खर्च ₹ ५००/– गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार हिस दयावा.

RAMESH RAOJI BHADRE
Digitally signed by RAMESH RAOJI BHADRE
Date: 2024.03.11 17:28:02 +0530

शिरपूर (आर. आर. भद्रे)

दिनांक – ११.०३.२०२४. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,(न्यायालय क्र.१),
शिरपूर, जि. धुळे.

***CERTIFICATE***

*I certify that the contents of the PDF File are word to word as per Original Judgment / Order.*

*Name of the Steno : Gopal A. Patil (L.G.)*
*Name of the Court : C.J.J.D. & J.M.F.C., Shirpur.*
*PDF Uploading Date : 11.03.2024.*